अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# पोटनिवडणुकांच्या निकालाने युतीच्या पोटात भीती

देशातल्या चार राज्यांमधल्या काही जागांवर झालेल्या पोटनिवडणुकांच्या निकालांनी महाराष्ट्र भाजपा-सेना युतीच्या पोटात भीतीचा गोळा निर्माण केला आहे. लोकसभा निवडणुकीतल्या विजयानंतर देशभर मोदी लाटेचा प्रभाव जाणवत होता. ही लाट महाराष्ट्र, हरियाणा,जम्मू-काश्मिर, झारखंड या राज्यांतल्या विधानसभा निवडणुकीसाठी कायम राहील असे अनेकांना वाटत होते. परंतु अपेक्षेपेक्षा खूपच लवकर ही लाट ओसरण्याची चिन्हे दिसतात. ज्या बिहारमध्ये लोकसभा निवडणुकीत नितीश कुमारांच्या जेडीयू आणि लालूंच्या आरजेडीला जबरदस्त पराभव स्वीकारावा लागला होता. आता तिथेच झालेल्या विधानसभेच्या दहा जागांवरच्या पोटनिवडणुकीत या दोघांनी भाजपाला मागे रेटले. दहापैकी सहा जागा या दोघांच्या युतीने जिंकल्या. तर यापूर्वी आठ जागा जिंकण्याऱ्या भाजपाला केवळ चार जागांवर समाधान मानावे लागले. चार राज्यांत १४ जागांसाठी झालेल्या पोटनिवडणुकीत काँग्रेसला सहा तर इतरांना चार जागा मिळाल्या. भाजपाला एकूण ८ जागांच टिकविता आल्या. या निकालावरून लोकांचा काल थोडा बदलला असल्याचे दिसते. लोकसभा निवडणुकीत निर्माण झालेले वातावरण वेगळ्या स्वरूपाचे होते. बऱ्याच वेळ लोकसभा निवडणुकीतला मतदारांचा कौल जसाच्या तसा विधानसभा निवडणुकीत परावर्तीत होईलच याची खात्री देता येत नाही. असा प्रकार फक्त १९७७ सालात झालेल्या काही विधानसभा निवडणुकांबाबत घडला होता. आणीबाणीनंतर झालेल्या लोकसभा निवडणुकीत लोकांनी काँग्रेसचा पराभव करून जनता पार्टीला विजयी केले होते. त्यावेळी कर्नाटक, बिहार, गुजरात आदी राज्यांत जनता पार्टीची राज्य सरकारे आली होती. परंतु महाराष्ट्रात तसे घडले नाही. शरद पवार काँग्रेसपासून फुटल्यामुळे पुरोगामी लोकशाही दल म्हणजेच नेतृत्वाखालील सरकार स्थापन झाले. पुढे सरकारही टिकले नाही वगैरे ते सोडून द्या! परंतु लोकसभा निवडणुकीतली जनता लाट राज्यात परावर्तीत झाली नव्हती. हा इतिहास जर पाहिला तर या पोटनिवडणुकांचे निकाल पुन्हा त्याच इतिहासाची पुनरावृत्ती करतील की काय, असे वाटल्याशिवाय राहत नाही.

### काँग्रेसच्या आशा पल्लवीत

म्हणूनच विधानसभा निवडणुकांमध्ये भाजपा-सेना आणि इतर पक्षांच्या महायुतीला विजयाची अपेक्षा असली तरी आता देशांतल्या या पोटनिवडणुकांमधल्या निकालाने या अपेक्षांना धक्का दिलेला आहे. विशेषत: ज्या राज्यामध्ये लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचा धुव्वा उडाला होता त्याठिकाणी काँग्रेसला विजय मिळणे ही गोष्ट बरेच काही संकेत देणारी ठरते. महाराष्ट्र आतापर्यंत काँग्रेसचा बालेकिल्ला मानला गेला. पहिल्यांदाच लोकसभा निवडणुकीत या बालेकिल्ल्याचे अनेक भक्कम बुरूज कोसळले. कारण तो एकूणच मोदी लाटेचा परिणाम होता. त्याच लाटेवर आरूढ होऊन आपण महाराष्ट्रातही सत्ता आणू शकतो अशी भाजपा नेत्यांची आशा पल्लवीत झाली. गेल्या तीन महिन्यांमध्ये दिल्लीत आलेल्या नव्या सरकारने सामान्य जनतेची फारशी अपेक्षापूर्ती केलेली नाही. महागाई भ्रष्टाचार या महत्त्वाच्या प्रश्नांवर मोदी सरकारने जी आक्रमक उपाययोजना करायला हवी होती ती झालेली नाही. उलट रेल्वे भाडेवाढ करून सामान्य जनतेचा फार मोठा अपेक्षाभंग झाला.त्याशिवाय काँग्रेसच्या काळामध्ये निर्माण झालेली गॅस सिलिंडर, रॉकेल यांची टंचाई अजूनही तशीच आहे. रेशन दुकानाच्या पुढे लोकांच्या लांबचलांब रांगा अजूनही तशाच आहेत. मोदी सरकार आल्यानंतर सरकारी खात्यांमधला भ्रष्टाचार ५ ते १० टक्क्यांनीदेखील कमी होईल, असेही लोकांना वाटत होते. ती अपेक्षादेखील पूर्ण झालेली नाही. केवळ एकापाठोपाठ नव्या योजनांच्या घोषणा तीन महिन्यांमध्ये झाल्या. परंतु निवडणुकीच्या प्रचार काळामध्ये दिलेल्या आश्वासनाच्या पूर्ततेसाठी फारसे ठोस पाऊल उचलले गेलेले दिसत नाही. अशा परिस्थितीत मोदी किंवा भाजपा यांचे सरकार काँग्रेसपेक्षा खूप काही वेगळे करून दाखवेल, याबद्दल लोकांच्या मनामध्ये शंका निर्माण होऊ लागल्या आहेत. लोकसभा निवडणुकीत भाजपाला संधी दिली गेलेली आहे. आता राज्यपातळीवर स्थानिक प्रश्न महत्त्वाचे ठरतात ते सोडविण्यासाठी आपल्या राज्यातल्या किंवा आपल्या गावातला उमेदवार निवडून आणण्याकडे लोकांचा कल राहू शकतो. बिहार किंवा कर्नाटकमध्ये लागलेले निकाल हे स्थानिक नाते सांगणारे म्हणावे लागतील. त्याचे पडसाद महाराष्ट्राच्या आगामी विधानसभा निवडणुकीत पडू शकतात.

### युतीला सावध रहावे लागेल

या निकालांमुळे निराश आणि हताश झालेल्या काँग्रेसला मोठा आधार मिळाला. बुडत्याला काडीचा आधार असे जे म्हणतात, त्याप्रमाणे लोकसभा निवडणुकीत धूळधाण झालेल्या काँग्रेसच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. अजून मोदी लाट कायम राहील आणि आपल्याला आणखीन पराभव स्वीकारावा लागेल. अशा मानसिक अवस्थेत गेलेल्या काँग्रेसला या पोटनिवडणुकांच्या निकालाने ऑक्सिजन दिला आहे. महाराष्ट्राच्याबाबत बोलायचे तर इथेसुध्दा त्यांना या परिस्थितीचा उपयोग करून घेता येईल. आज भाजपा-सेना युतीला पूर्वीपेक्षा जास्त अनुकूल परिस्थिती आहे ही गोष्ट खरी; परंतु गोपीनाथ मुंडेंसारखा धडाडीचा आणि आक्रमक नेता युतीकडे नसल्याने त्यांना त्यांची तीव्र उणीव भासणार आहे. काँग्रेसने मुंडेंच्या या अनुपस्थितीचा राजकीय वापर करून घेण्याचे ठरविलेले दिसते. म्हणूनच युतीला मुंडे यांच्यासारखा बलदंड नेता मिळालेला नाही. यावरून युती काँग्रेसशी सामना करू शकणार नाही असेही वातावरण काँग्रेसकडून निर्माण केले जात आहे. एक गोष्ट स्पष्टपणे दिसते, पोटनिवडणुकीच्या निकालापूर्वीचे वातावरण आणि आताची परिस्थिती यामध्ये बराच फरक पडू शकतो. युतीला आपण सहजपणे विजय मिळवू असे जे वाटत होते ते आता तितके सोपे राहिलेले नाही. राजकारणात परिस्थिती केव्हा बदलेल आणि जनता कोणाच्या बाजूने कसा कौल देईल हे काहीच सांगता येत नाही. म्हणूनच भाजपा सेना महायुती निवडणुकीसाठी सिध्द होत असली तरी त्यांना पूर्वीपेक्षा जास्त सावध रहावे लागणार आहे.